## प्रकरण - पाचवे

## उपसंहार

# प्रकरण पांचवे

## उपसंहार

### अभ्यासाचा उद्देश :

भाई माधवराव बागल एक राजकीय अभ्यास (विशेषत: प्रजा परिषद , कामगार संघटना व सत्यशोधक समाज ) हा शोध निबंधासाठी विषय निवडत असताना त्यांच्या नेतृत्वासंबंधी सर्वांगिन अभ्यास व्हावा हा एक मुख्य हेतु समोर होता. स्वातंत्र्यपूर्व व स्वातंत्र्योत्तर काळात झालेल्या जनआंदोलनात बागलांनी सक्रीय सहभाग करून चळवळीला निश्चित दिशा देण्याचा प्रयत्न केलेला होता. याचाही विचार या शोध निबंधात करण्यांत आला आहे. एका व्यक्तीच्या राजकीय जीवनाचा अभ्यास करीत असताना त्या काळातील सामाजिक, आर्थिक, राजकीय स्थितीचा अभ्यास होतो. त्यातूनच त्या विभागातील राजकीय विकासाच्या प्रक्रियेची जाणिव स्पष्ट होते. म्हणून माधवराव बागलांच्या राजकीय जीवनाचा या शोध निबंधात सखोलपणे अभ्यास करण्याचा प्रयत्न केलेला आहे. या शोध निबंधाचा अभ्यास करताना पुढील उद्देश सामान्यपणे निश्चित करण्यात आले होते.

१. भाई माधवराव बागलांच्या काळातील सामाजिक,राजकीय स्थिती कशी होती.
२. बागलांची वैचारिक जडण घडण
३. राजकीय चळवळीतील योगदान
४. नेतृत्वाची वैशिष्ठे
५. प्रबोधन व इतर कार्यातील सहभाग
६. राजकीय नेतृत्वाचे मूल्यमापन

SHIVAJI UNIVERSITY LIBRARY KOLHAPUR

वरील उद्देश डोळ्यासमोर ठेवून हा शोध निबंध पूर्ण करण्यासाठी ऐतिहासिक पध्दतीचा संशोधनासाठी वापर केलेला आहे. या पध्दतीत ऐतिहासिक कागदपत्रे, वृत्तपत्रे, शासकीय व निमशासकीय प्रकाशने, नियतकालिके, ग्रंथालये, पुस्तके, अप्रकाशित व प्रकाशित शोध निबंध, पत्रके, प्रत्यक्ष मुलाखती या साधनांचा उपयोग यात केलेला आहे. माधवराव बागलांची प्रत्यक्ष मुलाखत व त्यांची लिखित पुस्तके या कामात खूपच महत्वाची ठरलेली आहेत.

सा रां श :
========

शोध निबंधाच्या पहिल्या प्रकरणात थोडक्यात ऐतिहासिक पार्श्वभूमी दिलेली आहे. करवीर संस्थानाची निर्मिती महाराणी ताराराणीने केल्यानंतरच्या काळात राजघराण्यात शाहू महाराज सत्तेवर येईपर्यन्त अत्यंत शिथीलता आल्याचे चित्र दिसते. पेशव्यांचा हे संस्थान खालसा करण्याचा डाव मात्र मध्यंतरीच्या काळात परतवून लावण्यात यश मिळाले होते.

शाहू महाराजांच्या उदयानंतर या संस्थानातील राजवटीच्या नव्या पर्वाला सुरुवात झाल्याचेच चित्र दिसते. वेदोक्त प्रकरणानंतर शाहू महाराजांनी या संस्थानातील सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक क्षेत्रात आमुलाग्र परिवर्तन घडवून आणून जनतेचा लोकप्रिय राजा म्हणून आपले स्थान निर्माण केले. ब्राह्मणेत्तर चळवळीस या संस्थानात याच काळात राजाश्रय मिळाला. सामाजिक समतेच्या चळवळीचा याच काळात भक्कम पाया भरलेला दिसतो.

शाहू महाराजांच्या निधनानंतर या संस्थानच्या गादीवर राजाराम महाराज आले. त्याच काळात ब्रिटीश अमदानीत असलेल्या

.....

भागात कॉंग्रेसची चळवळ मोठया जोमाने गांधींच्या नेतृत्वाखाली सुरु झालेली होती. त्याचाही संस्थानातील जनतेवर परिणाम होऊन " जबाबदार शासन पध्दती " च्या मागणीसाठी प्रजा परिषदेची चळवळ सुरु झाली.

खंडेराव बागल या सत्यशोधक समाजाच्या क्रियाशील नेत्याच्या कुटूंबात याच काळात माधवराव बागलांचा जन्म झाला. बालवयात चित्रकलेसारख्या क्षेत्रात गुंतणाऱ्या बागलांनी या संस्थानातील जनतेच्या लोकशाही हक्कासाठी लढे उभे करुन ते यशस्वी करण्याचा प्रयत्न केलेला दिसतो.

दुसऱ्या प्रकरणात " प्रजा परिषद" चळवळीसंबंधी सविस्तर चर्चा करण्यांत आलेली आहे. शिरोळ येथील शेतक-यांच्या लढयानंतर बागलांच्या राजकीय जीवनास सुरुवात झाली. त्यानंतर त्यांनी जबाबदार शासन पध्दती संस्थानात लागू करावी या मागणीचा पाठपुरावा करण्यासाठी प्रजा परिषदेची स्थापना केली. नगरपालिका, ग्रामपंचायत आदी संस्थात सत्ता प्राप्त करण्यांत संघटनेला यश मिळाले. पुढील काळात संस्थानात वसंतराव बागलांच्या नेतृत्वाखाली प्रजा परिषदेचे मंत्रीमंडळ सत्तेवर आले. स्वातंत्र्योत्तर काळात गांधीवधानंतर झालेल्या दंगलीत बागल मंत्रीमंडळातील सदस्य चेतावणी देत होते असा आरोप होवू लागल्यानंतर बागल मंत्रीमंडळाने आपल्या पदाचा राजिनामा दिला. संस्थान विलीनीकरण प्रश्नावर बागलांनी विलीनीकरणास विरोध दर्शविला. त्यामुळे त्यांना स्थानबध्द करण्यांत आले. कोल्हापूर संस्थानचे छत्रपती शहाजी महाराजांनी विलीनीकरणास संमती दिल्यानंतर बागलांनी प्रजा परिषदेचे कार्य

.....

संपुष्टात आले म्हणून परिषदेचे शेतकरी कामगार पक्षात विलीनीकरण केले होते. मध्यंतरीच्या काळात प्रजा परिषदेत मतभेद होवून रत्नाप्पा कुंभार, श्रेष्ठी आदींनी समांतर संघटना स्थापन केली होती. त्यांनी सातत्याने बागल विरोधी भूमिका घेतली. विलीनीकरणास त्यांचा पाठिंबा होता.

तिसऱ्या प्रकरणात कामगार संघटना व तिच्या चळवळीसंबंधीची चर्चा केलेली आहे. कोल्हापूर संस्थानातील शाहु मिल, शुगर मिल, सिनेमागृह, कामगार, विणकाम कामगार, मेकॅनिकल कामगार, शासकीय कर्मचारी अशा विविध क्षेत्रांत काम करणाऱ्या कामगारांच्या प्रश्नासंबंधी प्रारंभीच्या काळात माधवराव बागलांनी आपल्या वृत्तपत्रातून लिखाण करून ते प्रश्न मांडले. त्यानंतर संघटना स्थापन केली. विविध क्षेत्रातील कामगारांच्या संघटनात समन्वय साधण्यासाठी कामगार फेडरेशनची स्थापना केली. अहिंसक मार्गाने चळवळ उभी करून कामगारांना त्यांच्या मागण्या मिळवून देण्यात बागलांना यश मिळाले. १९४१ ते १९४८ या आठ वर्षांच्या काळात बागलांनी अनेक लढे यशस्वी केले. कामगारांना विधायक दृष्टी देण्यापासून ते राजकीय जाणीव निर्माण करून देण्यापर्यन्त बागलांनी जाणिवपूर्वक कार्य केलेले आहे.

चौथ्या प्रकरणात सत्यशोधक समाज व बागल याचा अभ्यास करण्यांत आलेला आहे. महात्मा फुल्यांनी स्थापन केलेल्या सत्यशोधक समाजाची चळवळ विसाव्या शतकाच्या प्रारंभी व्यापक होत गेली. माधवराव बागलांचे वडील सत्यशोधक समाजाचे क्रियाशील कार्यकर्ते असल्यामुळे या विचारांचा प्रभाव बालपणापासून बागलांवर पडलेला दिसतो. शाहु महाराजांच्या काळात करवीर संस्थानात या चळवळीला

.....

पोषक वातावरण मिळाले. पुढे या समाजाचे ब्राह्मणेत्तर पक्षात रूपांतर होवून ब्रिटीशांच्या बाजून व विरोधात असे दोन गट पडले. ब्रिटीशांच्या बाजूने असणाऱ्यात भास्करराव जाधव हे एक प्रमुख नेते होते. तर कॉंग्रेसच्या चळवळीत सक्रीय होवून राष्ट्रीय प्रवाहात सहभागी व्हावे या मताचे विठ्ठल रामजी शिंदे,भाऊराव पाटील, केशवराव जेधे हे नेते होते. माधवराव बागल शिंदे, पाटील, जेधे यांच्यात प्रवाहात सहभागी होण्यात आग्रही होते.

शेतकरी व कामगारांचे राज्य स्थापन करू इच्छिणाऱ्या शेतकरी कामगार पक्षात माधवराव बागल सहभागी झाले. पुढील काळात पक्षांतर्गत मतभेदामुळे बागलांनी अलिप्त राहण्याचा निर्णय घेतला. याच काळात भाषिक राज्य पुनर्रचनेच्या प्रश्नावरून महाराष्ट्रात संयुक्त महाराष्ट्राचे आंदोलन सुरु झाले. या चळवळीत माधवराव बागल प्रमुख नेते म्हणूनच क्रियाशील होते. चार महिने कारावासही झाला. या चळवळीतील त्यांचे योगदान महत्वाचे ठरले. १ मे १९६० रोजी संयुक्त महाराष्ट्राची निर्मिती झाल्यानंतर कॉंग्रेसमध्ये असलेल्या बहुजन समाजातील यशवंतराव चव्हाण, बाळासाहेब देसाई या नेत्यांना मदत करण्यासाठी व नेहरूंच्या समाजवादाची अंमलबजावणी व्हावी यासाठी कॉंग्रेसला बाहेर राहून मदत करण्याचा निर्णय माधवराव बागलांनी घेतला. शेवटपर्यन्त ते या भूमिकेशी कायम राहिले होते.

## बागलांचे राजकीय नेतृत्व :

संस्थानिकाच्या राजवटीत असलेल्या जनतेच्या चळवळीतून भाई माधवराव बागलांचे राजकीय नेतृत्व विकसीत झाले. संस्थानात

.....

"जबाबदार शासन पध्दती" चा मार्ग अवलंबावा या मागणीसाठी प्रजा परिषादेच्या नांवाने बागलांनी व चळवळ सुरु केली. त्यातून त्यांनी जनसंघटन उभे करुन जनशक्तीच्या जोरावर जनतेचे लोकशाही हक्क मिळवून घेण्यात यश प्राप्त केले. ग्रामिण स्तरावरील नेतृत्वाचा विकास व्हावा यासाठी ग्रामपंचायतीचा प्रयोग करुन त्यातून ग्रामिण भागात असलेल्या सावकार, गुंड व जमिनदारांच्या विळख्यातून जनता मुक्त करण्याचा प्रयत्न केलेला होता. शेतक-यांची चळवळ उभी करीत असताना बागलांनी विविध क्षेत्रात काम करणा-या असंघटित कामगारांना त्यांच्या मुलभूत हक्कासाठी संघटित होवून चळवळ करण्याचा हक्क मिळवून देण्यात यश प्राप्त केले. शांततामय मार्गाने कामगार चळवळ चालवून त्यांच्या मागण्या त्यांनी पदरात पाडून घेतल्या. प्रश्नासाठी झगडत असताना राजकीय प्रशिक्षण देणे कामगारांना गरजेचे आहे याचे भानही ठेवून बागलांनी कामगारात राजकीय चेतना निर्माण केलेली होती. विधायक कार्यात कामगारांच्या संघटीत शक्तीचा वापर करुन घेतलेला दिसतो. सर्व क्षेत्रातील कामगारांची शक्ती संघटीत करून परस्परांच्या प्रश्नासंबंधी सामुहिक चळवळ उभी करता यावी यासाठी त्यांनी कामगारांच्या फेडरेशनची कल्पना मांडून ती अंमलात आणली.

शेतकरी कामगारांचे राज्य निर्माण करता यावे म यासाठी देशाला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर कोल्हापूर संस्थान विलीन करण्यास बागलांनी विरोध केला होता. कारण स्वातंत्र्योत्तर काळात ज्या कॉंग्रेसकडे सत्ता जाणार होती त्या पक्षात भांडवलदार व जमिनदारांचे समर्थन करणारे नेतृत्व होते त्यामुळे शेतकरी कामगारांना न्याय मिळू

.....

शकणार नाही अशी बागलांची धारणा होती. छत्रपतींच्या संमतीने संस्थान विलीनीकरणाचा निर्णय झाल्यानंतर माधवराव बागलांनी महाराष्ट्रात नव्याने स्थापन झालेल्या शेतकरी कामगार पक्षात प्रजा परिषदेचे विसर्जन करण्याचा निर्णय घेतला. शेतकरी कामगार पक्षाची वैचारिक भूमिका बागलांना जवळची वाटत होती.

शेतकरी कामगार पक्षात असलेल्या ब्राह्मणेत्तर नेतृत्वा बाबत बागलांना आस्था वाटत होती. पण या पक्षात अंतर्गत मतभेद विकोपाला जाऊ लागले. पक्षातून मान्यवर नेते बाहेर पडू लागले. तेंव्हा निराश होवून बागलांनी पक्षाचा राजिनामा देवून अपक्ष राहण्याचा निर्णय घेतला.

शेतकरी कामगार पक्षातच काम करीत असताना नंतर बागलांनी संयुक्त महाराष्ट्र आंदोलनात भाग घेतला. भाषिक राज्य पुर्नरचनेत मराठी भाषिक जनतेचे एक राज्य व्हावे व त्यातून मुंबईवर असलेले भांडवलदारांचे वर्चस्व संपुष्टात यावे ही यामागची बागलांची भूमिका होती. या चळवळीत त्यांनी स्वत:ला सर्वस्वी झोकून दिले. पुढे या मागणीची पुर्तता होवून १ मे १९६० रोजी मुंबईसह महाराष्ट्राची स्थापना झाली. यानंतर कॉंग्रेसमध्ये यशवंतराव चव्हाण, बाळासाहेब देसाई आदी बहुजन समाजातील नेतृत्वाची पकड निर्माण झाल्यानंतर व जवाहरलाल नेहरूंच्या समाजवादाच्या घोषणेनंतर बागलांनी कॉंग्रेसला पक्षाबाहेर राहून मदत करण्याचा निर्णय घेतला. अखेरपर्यन्त त्यांनी कॉंग्रेसलाच पाठिंबा देण्याची भूमिका ठेवली होती.

सामाजिक चळवळीच्या संदर्भात माधवराव बागल आग्रही म्हणून ओळखले जात होते. सामाजिक समतेच्या आंदोलनात त्यांनी

.....

सातत्याने पुढाकार घेतला. मंदिर प्रवेश, मिश्र विवाह, सहभोजन आदी कार्यक्रम त्यांनी घडवून आणले. नामांतर , मंडल आयोग, राखीव जागा या प्रश्नावर त्यांनी स्पष्ट भूमिका मांडून चळवळीत सक्रीय भाग घेतला होता.

वैचारिक भूमिका :

भाई माधवराव बागलांची वैचारिक जडणघडण निराळ्या स्वरूपाची होती. त्यांची वैचारिक भूमिका महात्मा जोतीराव फुल्यांच्या सत्यशोधक समाजाची सांगणारी होती. सत्यशोधक विचारांचा पगडा त्यांच्या मनावर बालपणापासूनच पडल्यामुळे ते आयुष्यभर सत्यशोधक म्हणूनच वावरले. अंधश्रध्दा, बुवाबाजी, धर्माचे कर्मकांड, ब्राह्मणी पुरोहित या गोष्टी त्यांनी प्रारंभीपासूनच नाकारून या गोष्टींच्या विळख्यात सापडलेल्या अडाणी निरक्षर बहुजन समाजाला सोडविण्यासाठी प्रबोधन करण्याचा कार्यक्रम त्यांनी हाती घेतला. सत्यशोधक समाजात रूढ होत चाललेल्या चाली रितीला देखील त्यांनी विरोध केला. शाहू महाराजांनी स्थापन केलेल्या धर्मपीठालाही बागलांनी विरोध केलेला होता.

सत्यशोधक विचारातील शेतकरी कामगारांच्या राज्याची संकल्पना बागलांनी सातत्याने मांडली. सर्वच क्षेत्रातील ब्राह्मणवादाचा त्यांनी विरोध केला. सामाजिक समतेवर आधारित असलेल्या समाजाची वर्ण व वर्ग विरहीत रचना बागलांना अभिप्रेत होती.

प्रजा परिषदेची व कामगार चळवळ करीत असताना बागलांनी मार्क्सवादाचा सैध्दांतिक अभ्यास केला. मार्क्सने शास्त्रीय पध्दतीने केलेले विश्लेषण व क्रांतीचा मार्ग बागलांनी आत्मसात करून डाव्या

.....

विचारांचे राजकारण करण्याचा त्यांनी प्रयत्न केला. समाजातील शोषित घटकांच्या हितासाठी सत्तेच्या विकेंद्रीकरणाची कल्पना त्यांनी सातत्याने मांडलेली होती. मार्क्सवादाचा त्यांच्यावर प्रभाव कायम होता.

संस्थानातील चळवळ करीत असतानाच बागल गांधीजींच्या स्वातंत्र्य चळवळीकडेही आकर्षित झालेले होते. गांधींच्या विचारातील अहिंसा, सत्याग्रह, शांततामय मार्गाचा वापर या गोष्टींचा बागलावर फार मोठा प्रभाव होता. आपल्या सर्व चळवळी या मार्गानेच चालवण्याचा त्यांनी कटाक्ष पाळला होता. ब्राह्मणेत्तर चळवळीतील पुढा-यांनी व जनतेनी गांधींच्या नेतृत्वाखालील राष्ट्रीय चळवळीत सहभागी व्हावे या मताचे बागल होते. स्वातंत्र्य चळवळीस विरोध करणा-या ब्राह्मणेत्तर नेत्यावर बागलांनी प्रखर टिकाही केलेली होती.

माधवराव बागलांची वैचारिक बैठक सत्यशोधक, मार्क्सवाद, गांधीवाद अशा मिश्र स्वरूपाची होती. भारतीय समाजव्यवस्थेचे स्वरूप लक्षात घेवून त्यांनी आपल्या विचारांची दिशा स्पष्ट केलेली होती. सामाजिक व आर्थिक क्षेत्रातील विषमता व शोषण नष्ट करून नवा समाज उभा करण्याचे स्वप्न बागलांच्या वैचारिक भूमिकेतून दिसते.

नेतृत्वाचे वैशिष्टे :

भाई माधवराव बागलांचे नेतृत्व पाहत असताना त्यांच्यातील कला गुण सातत्याने पाहण्यास मिळतो. कलाकाराचे भावनाशिल मन त्यांच्याकडे असल्यामुळे कोणत्याही घटनेशी भावनिक नाते जोडणारा हा नेता ब-याचवेळा हळवा बनल्याचा दिसतो.

.....

बागलांच्या नेतृत्वात तडफदारपणा होता. प्रश्न समोर आला की त्याची तड लावल्याशिवाय त्यांना स्वस्थ बसणे अशक्यच होत नव्हते. त्यांच्यात स्पष्टवक्तेपणा होता. त्यामुळे माणसे दुखावण्याचे प्रसंग त्यांच्यावर फारवेळा आले होते. पण त्यांनी त्याची कधीही चिंता केलेली दिसत नाही.

चळवळीच्या रेटयात बागलांचे नेतृत्व उठून दिसत असले तरी इतरांचे मत ऐकून घेण्यात त्यांना रस वाटत नव्हता. सातत्याने हटवादी भूमिका ते स्विकारीत असत. संघटना कौशल्य त्यांच्याकडे फारसे उत्तम नसल्यामुळे त्यांना संघटना बांधणीत फारसे यश मिळाले नाही. त्यामुळे चळवळींचा जोर ओसल्यानंतर बागल एकाकीच पडत असत.

सामाजिक वैचारिक प्रबोधनाची चळवळ सातत्याने चालावी यासाठी त्यांनी प्रचंड लेखन व व्याख्याने केलेली आहेत. प्रतिगामी शक्तींच्या धोक्यापासून समाजाला सावध करण्याचे प्रयत्न करणे व त्यासाठी लढा देणे हे ते आपले आद्य कर्तव्य समजत असत. त्यादृष्टीने त्यांनी मुबलक कार्य केलेले दिसते.

विविध चळवळीतून काम करूनही माधवराव बागल सत्तेच्या सक्रीय सहभागापासून अलिप्त राहिले हे एक अत्यंत महत्वाचे वैशिष्टये होते. राजकीय पक्षात काम करूनही त्यांनी निवडणूकीचे राजकारण नाकारले. त्यांनी प्रचारकाचीच भूमिका आपण पार पाडू असे स्पष्ट केले होते. सत्तेच्या राजकारणात तडजोडी कराव्या लागतात, तत्वत: तडजोडी करण्यासच बागलांचा विरोध होता. म्हणून त्यांनी कोणत्याही पदावर आपण जाणार नाही अशीच भूमिका शेवटपर्यंन्त कायम ठेवली.

.....

मूल्यमापन :
=======

भाई माधवराव बागलांच्या राजकीय योगदानाचे व नेतृत्वाचे मुल्यमापन करीत असताना त्यांच्या विविध पैलूंचा व विचारांचा मागोवा घेणे क्रमप्राप्त ठरते.

संस्थानिकाच्या सरंजामी व राजेशाही स्वरूपाच्या राजवटीतील सामान्य जनाना संघटित करून त्यांच्यात लोकशाही मुल्यांची जाणिव निर्माण करून त्यादृष्टीने चळवळ उभी करण्याची जिद्द माधवराव बागलांनी बाळगली होती. फुलेंच्या शुद्र-अतिशुद्रांच्या न्याय मागण्यासाठी लढा देणे व संपूर्ण समाज बदलण्याची प्रक्रिया गतीमान करणे यासाठी बागलांनी सातत्याने प्रयत्न केलेले दिसतात.

सरंजामी व्यवस्थेत असलेले शोषणाचे मार्ग बदलून नव्या पध्दतीची व्यवस्था निर्माण करण्याची संकल्पना बागलांनी त्या काळात मांडलेली होती. निरक्षर असलेल्या समाजाला साक्षर बनवून त्यांच्यावरील होणा-या अन्यायाची जाणीव निर्माण करून देणे या फुल्यांच्या मार्गाचा अवलंब बागलांनी केलेला होता. जाती व धर्म व्यवस्थेच्या शृंखालात अडकलेल्या समाजाला मुक्त करण्यासाठी त्यांनी धर्म, देव याही संकल्पना झुगारून दिलेल्या होत्या. वैचारिक स्पष्टता असावी व त्यादृष्टीने व्यक्तीगत व सामाजिक जीवन चालावे यासाठी बागलांनी आपल्या चळवळीची दिशा ठरवली होती. चित्रकारातून बागल मुक्त झालेले नव्हते. त्यामुळेच त्यांच्या कृतीत भावनाशिलता दिसून येते. भावनिक पातळीवरूनच ते प्रत्येक प्रश्नात स्वत:ला तपासत असल्यामुळे त्यांच्यात असलेला उत्साह हा क्षणात संपण्याचा धोकाही दिसत होता.

.....

भाई बागलांच्या विचारावर सत्यशोधक विचाराचा प्रभाव प्रचंड होता. त्यामुळे त्यांच्या शेतकरी कामगार राज्याच्या स्वप्न पूर्तीसाठी त्यांनी आपल्या राजकीय भूमिका ठरविलेल्या होत्या. सध्याच्या व्यवस्थेत ही कल्पना साकार होणे अशक्य होते. तरी पण बागल त्या स्वप्नात रममान झालेले तरी दिसतात.

माधवराव बागलांनी संस्थानातील चळवळ करीत असतानाच राष्ट्रीय चळवळीचा झेंडा हाती घेतला. समाजातील ब्राह्मणशाही, मराठ्यातील जातीनिष्ठा, सरंजामशाही आणि भांडवलशाही या सर्वांविरूध्द त्यांनी बंड पुकारले. माधवरावांचा स्वभाव भावनाप्रधान असल्यामुळे जेव्हा शांतता व विधायक प्रवृत्तीचे वातावरण असते तेंव्हा त्यांचे नेतृत्व मंदावते. ते बाजूस पडत असत पण जेव्हा चळवळीची लाट येते तेंव्हा मात्र त्यांचे नेतृत्व उठून दिसते. गटबाजीचे राजकारण त्यांना फारसे जमले नाही त्यामुळे ब-याचवेळा ते एकाकी पडलेले दिसतात.

माधवराव बागलांची सामान्य जनतेशी बांधिलकी असल्यामुळे त्यांनी कधीच सत्तेच्या राजकारणाचा मोह ठेवला नाही. पण त्यांच्या न जाण्यामुळे समाजाचे नुकसानच झाले असेही मत व्यक्त करण्यांत येते. कारण त्यांच्या कल्पनेला मुर्त स्वरूप देण्याचे कार्य त्यांना सत्तेत जाऊन करता आले असते.

भाई बागलांचा एकांगी स्वरूपाचा स्वभाव व हटवादीपणा हा त्यांच्या राजकीय विकासात कांहीसा अडथळा ठरलेला दिसतो.

राजकीय कार्यकारीत असताना नेत्यात संघटन कौशल्य अत्यंत गरजेचे असते. संघटना बांधणीशिवाय कोणत्याही नेतृत्वास फार काळ

....

टिकून राहता येत नाही. पण या महत्वाच्या बाजूकडे माधवराव बागल दुर्लक्ष करीत होते. त्यामुळे त्यांचे नेतृत्व चळवळींच्या लाटावरच राहिले. चळवळ ओसरली की नेतृत्व मंदावते तसाच अनुभाव बागलांच्या राजकीय जीवनात आलेला दिसतो.

राजकीय जीवनात नेता म्हणून कार्य करीत असतांना माधवराव बागलांनी कोणतीही तडजोड स्विकारलेली दिसत नाही हे अत्यंत महत्वाचे वैशिष्टय त्यांच्या नेतृत्वात दिसून येते.

माधवराव बागल हे जसे राजकीय नेते म्हणून महाराष्ट्राच्या स्वातंत्र्योत्तर व स्वातंत्र्यपूर्व काळात आपला ठसा उमटावणारे आहेत तसेच त्यांचे इतरही क्षेत्रातील कार्य अत्यंत मोलाचे म्हणूनच ओळखाले जाते.

बागल हे चित्रकार, शिल्पकार, साहित्यिक, समाज सुधारक, पत्रकार, कला समिक्षक, प्रभावी वक्ते म्हणूनही ओळखाले जातात. या सर्व क्षेत्रातही ते नामांकित व अव्वल दर्जाचेच म्हणून प्रसिध्द होते. त्यांनी या क्षेत्रातही आपले योगदान केलेले दिसते. त्यांचा ठसा इथेही वैशिष्टपूर्ण दिसतो.

भाई बागल हे महाराष्ट्राच्या राजकीय व सामाजिक चळवळीतील विसाव्या शतकातील अत्यंत प्रभावी नेतृत्व होऊन गेले. जोतीबा फुल्यांच्या चळवळीचा अखेरचा दुवा म्हणूनच बागलांची ओळख महाराष्ट्राला झालेली आहे. तात्वीक तडजोडीला सातत्याने नकार देणारा हा नेता आपल्या सत्यशोधक भूमिकेशी अंतिम क्षणापर्यन्त

.....

प्रामाणित राहून संघर्ष करीतच जगला. संघर्ष व प्रबोधनातून हे नेतृत्व पुढे आले होते. वैचारिक प्रामाणिकपणा हेच बागलांच्या जीवनातील प्रमुख सुत्र दिसते.

=Ø=Ø=Ø=Ø=Ø=Ø=Ø=Ø=Ø=Ø=Ø=